'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF)-6.261(2017),
UGC Approved Journal Special Issue 68 : दीक्षाभूमी आणि धम्मचक्र प्रवर्तन
ISSN : 2348-7143
October. 2018

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर व धम्मचक्र प्रवर्तन

**डॉ. एल.बी. डोंगरे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि.नांदेड. 431802

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोंबर, १९५६ रोजी बौध्द धम्माची घेतलेली दिक्षा भारतीय इतिहासातील एक क्रांतीकारक घटना ठरली आहे. या धम्मक्रांतीने प्राचीन मानवतावादी, विज्ञानवादी, अहिंसावादी, शांततावादी बौध्द धम्माचे पुनरुजिवन झाले आहे. तत्कालीन भारतीय समाज हा वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेवर आधारीत होता. या भारतीय समाजात भेदभाव, व्यवसायावर आधारीत जात, कर्मापेक्षा जातील श्रेष्ठ स्थान, श्रेष्ठ-कनिष्ठ, रोटी-बेटी व्यवहार बंदी, सामाजिक विषमता, यज्ञयाग कर्मकांड या परंपरागत विचारसरणीवर, मुल्यावर आधारीत होता. त्यामुळे दलित अस्पृश्य समाजाच्या वाटयाला अपमान, शोषण, दुय्यमत्व यामुळे माणसाला माणुस म्हणुन जगण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले होते. या जातीयवादी, वर्णव्यवस्थावादी व्यवस्थेने दलित अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या माणसाला समाजात जनावरांपेक्षाही भयानक जिवन हजारो वर्ष जगावे लागले. विश्व व्यवस्थेत एकढा अमानुष शोषण, अन्याय, अत्याचार कोणत्याही समाजावर झाले नाहीत. या सामाजिक विषमतावादी व्यवस्थे विरुध्द डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी क्रांतीचा लढा उभारला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या आयुष्यात जातीयतेचे चटके स्वत: अनुभवली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले शिक्षण पुर्ण करुन भारतात आल्यानंतर डॉ.सयाजीराव गायकवाड यांनी बडोदा संस्थानात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना नौकरी दिली होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपली जात चोरून एका पारशी समाजाच्या घरी राहात होते. एक अस्पृश्य पारशाच्या घरी राहतो ही बातमी बडोद्यातील जातीयवादी लोकांना कळाली. शे-दोनशेचा जमाव त्यांना मारण्यासाठी आला होता. तो जमाव म्हणु लागला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आमच्या ताब्यात द्या म्हणु लागला. तेंव्हा तो पारशी म्हणाला मी आंबेडकर यांना आत्ताच हे शहर सोडायला सांगतो परंतु त्यांच वेडवाकड न करता तुम्ही परत जा पारशी समाजाच्या व्यक्तीने त्या जातीयवाद्यांची समजुत काढली होती. जमाव परत गेला बाबासाहेबांना पारशी म्हणाला "डॉ.बाबासाहेब आंबेडकर तुम्हाला तुमच्या जिवाचे मोल नसेल ही परंतु ते समाजाला आहे. लाख जावो पण लाखांचा पोशिंदा जगलाच पाहिजे. म्हणुन तुम्हाला तुमच्या लोकांसाठी त्यांच्या कल्याणासाठी जायलाच पाहीजे." अशा पध्दतीने अस्पृश्य असल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना बडोदा संस्थानातील नौकरीच्या ठिकाणी आणि वास्तव्याच्या ठिकाणी कटु अनुभव आला. या वर्णवादी, जातीयवादी व्यवस्थेची पोलादी चौकटीला भेदण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२४ ते १९३० या काळात सामाजिक सुधारणा, जातीयता अस्पृश्यते विरुध्द काळाराम मंदिर प्रवेश, महाडचा सत्याग्रहासारखे लढे उभारले. १९३० ते १९५५ या काळात दलित अस्पृश्यांच्या उध्दारासाठी, कल्याणासाठी राजकीय सत्तेशिवाय पर्याय नाही हे लक्षात घेवून बहिष्कृत हितकरणी सभा, स्वतंत्र मजूर पक्ष, शेडयुल्ड कास्ट फाऊंडेशन आणि रिपब्लीकन पक्ष यासारख्या राजकीय संघटना स्थापन करण्यावर भर दिला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हजारो वर्षापासून चालत आलेली मानवनिर्मित विषमता, अस्पृश्यता, जातीयता नष्ट करण्याचा संकल्प केला. दलित अस्पृश्य बांधवांना त्यांचे मानवी हक्क, स्वातंत्र्य, प्रतिष्ठा, सन्मान प्रदान करुन देण्यासाठी आपले संपुर्ण आयुष्य समर्पीत केले आहे. ज्या हिंदु धर्मात शेकडो पिढया शापीत म्हणुन जिवन जगल्या तो धर्म आजही आम्हाला माणुस म्हणुन जगु देत नसेल तर असा धर्म आमच्या काय कामाचा ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १३ ऑक्टोंबर, १९३५ रोजी नाशिकच्या येवला येथे हजारो अनुयांयासमोर घोषणा केली की "दुर्देवाने मी जरी हिंदु

ISSN : 2348-7143 October. 2018

धर्मात जन्माला आलो हा काही माझा गुन्हा नाही परंतु मरतांना मात्र मी हिंदु म्हणुन मरणार नाही'' या घोषणेनंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी २१ वर्षांनी बुध्द धम्माकडे वळले. जो धम्म विज्ञानवादी, मानवतावादी, शांततावादी, अहिंसावादी अशा भारतीय धम्माचा स्विकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोंबर, १९५६ ला नागपुर या ऐतिहासीक ठिकाणी आपल्या लाखो अनुयायांसह बौध्द धम्माचा स्विकार सहज केला नाही तर भारतातील सर्व धर्मांचा गांभिर्याने अभ्यास केला एखाद्या धर्मांचा स्विकार केला तर त्याचा सकारात्मक, नकारात्मक परिणाम माझ्या देशावर काय होईल याचा गांभिर्याने अभ्यास करुनच बौध्द धम्माचा मार्ग त्यांनी निवडला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुंबई मध्ये १४ जानेवारी, १९५१ रोजी बौध्द धर्माबाबत म्हणाले ''धर्माशिवाय समाज जगणार नाही आणि तो धर्म बौध्द धर्म आहे. समता, प्रेम, बंधुभाव या सर्व बाबी जगाच्या उध्दाराकरीता आवश्यक असतील त्या बौध्द धर्मातच सापडतील'' मी २१ वर्ष सर्व धर्मांचा अभ्यास केला. सर्व धर्मांचा अभ्यास केल्यावर जगाने बौध्द धर्मच स्विकारायला पाहिजे असे माझे मत आहे. बुध्दाच्या तत्वज्ञानात शांती, अहिंसा आहे. जगाला आज शांती आणि अहिंसेची गरज आहे. बुध्द आणि युध्द या पर्यायात बुध्द हा पर्याय योग्य आहे. सम्राट अशोकाने कलिंगच्या युध्दातील झालेली मानव हानी व हिंसा पाहून त्यांचे हृदय परीवर्तन झाले. म्हणुन सम्राट अशोकाने युध्द नको बुध्द हवा हा विचार करुन त्यांनी बुध्दाच्या विचारापुढे शरण आले. लोप पावलेल्या बौध्द धर्माचा प्रचार, प्रसार करुन बौध्द धर्म हा जगभर प्रसारीत केला आहे. तथागत भगवान बुध्दांचा धम्म हा बुध्दीवादावर अवलंबून आहे. बुध्द म्हणतात मी सांगतो म्हणुन मार्ग स्विकारु नका तुमच्या सदसद विवेक बुध्दीला पटत असेल तरच स्विकारा. मी काही ईश्वर नाही मी फक्त मार्गदाता आहे. म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे बुध्दाच्या बुध्दीवादी धम्माकडे आकर्षित झाले होते.

भगवान बुध्दाने चार्तुवर्ण आणि जातीवाद नाकारला आहे. बुध्दाला जातीभेद मान्य नाही. समता हा बुध्दाच्या धम्माचा गाभा आहे. माणसा-माणसांत भेद केला नाही. माणसां-माणसांत भेद करणारा तो धर्मच असु शकत नाही. सर्व मानवी समाज हा समान आहे. ही समतेची शिकवण बुध्दाच्या धम्माने दिली म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धम्माचा स्विकार केला आहे.

हिंदु धर्मातील चार्तुवर्ण आणि जातीयता देवाच्या नावाने धर्म ग्रंथामधून सांगितलेली असल्यामुळे आणि त्याला जन्माच्या संचिताचा आधार दिल्यामुळे त्यांच्या मुळावर घाव घालण्यासाठी देव, धर्म आणि या सर्व शोषणकारी व्यवस्था नाकारणारे तत्वज्ञान बुध्दाचा धम्म सांगतो. बुध्द धम्मामध्ये ईश्वराच्या ठिकाणी नितीला महत्वाचे स्थान आहे. म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बौध्द धर्माचा मार्ग स्विकारला.

दारिद्रय, विषमता, अज्ञान व सर्व प्रकारचे शोषण हीच खऱ्या दु:खाची कारणे आहेत. अस्पृश्यता हा केवळ धार्मीक प्रश्न नव्हता तर तो आर्थिक व सामाजिक विषमतेशी संबंधीत आहे. बुध्दाचा धम्म हा शिल, चारित्र्य, व्यक्ती स्वातंत्र्य, समता व लोकशाहीचे व्यासपीठ आहे. म्हणुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्व धर्मीयांना वंदनीय वाटणारा व भारतीय मानसिकता व संविधानीक मुल्य जोपासणाऱ्या अशा बौध्द धम्माचा स्विकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेला बौध्द धम्म हा पारपंरीक बौध्द धम्मापेक्षा वेगळा आहे. त्यात व्यावहारीक विज्ञानवादी, बुध्दीवादी भुमिका घेवुन बदल केले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाला समतेच्या पातळीवर आणणारा लोकशाही व्यवस्थेला पुरक असलेला विचार स्विकारुनच बौध्द धम्म सांगितला आहे. हजारो वर्ष अंधारात खितपत पडलेल्या दलित अस्पृश्य समाजाला बौध्द धम्माच्या माध्यमातून नवीन वाट, नवीन प्रकाश, नवा विचार दिला आहे. बौध्द धम्माच्या स्विकाराने दलित अस्पृश्य समाजाच्या जिवनाचे खरे सोनेच झाले आहे. हे नाकरता येणार नाही. अस्तीत्व नसलेल्या माणसाला ज्ञान, मान, सन्मान, प्रतिष्ठा, पदे, आत्मसन्मान मिळाला म्हणुन अल्पावधीतच या समाजाने बुध्दाने आणि बाबासाहेबांनी सांगितलेल्या विचाराच्या बळावर जगाला लाजवेल अशी नेत्रदिपक प्रगती केली आहे. बुध्दाने आणि बाबासाहेबांनी सांगितलेल्या बुध्दाच्या प्रज्ञा, शिल, करुणा, सदाचार, आर्य अष्टांग मार्ग, चार आर्य सत्य, पंचशिल, दहा परिमिता, २२ प्रतिज्ञांचे पालन प्रत्येक नागरीकाने केल्यास

मानवी जिवन निश्चितच सुकर होईल. डॉ.बाबासाहेबांनी सांगितलेल्या बुध्द धम्म हा माणसाच्या प्रगतीचा, सामाजिक नितीमत्तेचा, मानवी मुल्य जोपासणारा आणि माणणारा जिवन मार्ग आहे. दलित अस्पृश्य समाजाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुध्दाचा धम्म देवून जवळपास ६२ वर्ष पुर्ण झाली आहेत. परंतु खरचं बुध्दाचे अनुयायी अहोत का ? याचे आत्मपरीक्ष प्रत्येक बुध्दाच्या अनुयायांना करण्याची गरज आहे. ६२ वर्ष होवूनही बौध्द म्हणणाऱ्या समाजात ईश्वर, आत्मा, कर्मकांड, आत्मा, नवस, उपवास, अंधश्रध्दा या सारख्या संकल्पनांवर विश्वास आणि श्रध्दा ठेवतांना किंवा त्याचे अनुसरण करतांना दिसतो म्हणुन गौतम बुध्दांनी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या आदर्श मार्गाने धम्माच्या निखळ व स्वच्छ आचरणाने स्वतःची स्वतंत्र संस्कृती, अस्तीत्व निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

******